झोपुप्रा / प्रशा.

दि. २१/६/१८ रोजी झालेल्या झो.पु.प्रा. च्या सातव्या बैठकीचे कार्यवृत्त मा. मुख्यमंत्री व प्राधिकरणाच्या अध्यक्षांना मान्यतेसाठी सादर केले होते. सदर कार्यवृत्ताची प्रत प्राधिकरणातील विभाग-प्रमुखांकडे पाठविण्यात आली होती व त्यांचेशी संबंधित असलेल्या मुद्यांसंबंधी आवश्यक कार्यवाहीस सुरुवात करण्यात करण्याची विनंती करण्यात आली होती.

मा. मुख्यमंत्री यांना सादर केलेले कार्यवृत्त व इतिवृत्त मा. मुख्यमंत्री यांना मान्य असल्याचे गृहनिर्माण विभागाने कळविले आहे.

उपरोक्त बाब माहितीसाठी सादर.

राधे
सातेर्ले

[signature]
का. प्र. अ. २९/८

सचिव

उपसंचालक न. र.
अपर जिल्हाधिकारी
वित्त नियंत्रक
मरला आकियंता.

स्वी. स. / मु. का. अ.
यांचेकडे माहितीसाठी

1. मुख्य अभियंता. ✓ [signature] 13.8.98
2. वित्त नियंत्रक. [signature] 13/8
3. उप संचालक. [signature]
4. सचिव. Jadhao 13/8
5. अपर जिलाधिकारी — S Sahi 13/8/98
6. ई.टी. ए. / मु. का. अ. [signature] 14/8/98

९३९/पृ

झोपडप... प्राधिकरण
अनु. ... ५२५८
दि. ...१०.८.९८...

क्रमांक : बैठक-१०९८/प्र.क्र.९५/झोपसु-४
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ~~२१ जुलै, १९९८.~~ ६।८।९८

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),
मुंबई ४०० ०५१.

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सातव्या बैठकीच्या कार्यवृत्तास व इतिवृत्तास मंजूरी मिळण्याबाबत.

संदर्भ : आपले क्रमांक झोपुप्रा/बैठक/प्र.क्र ४१/९८/प्र.शा./१३३२ दि.१४ जुलै, १९९८ चे पत्र.

महोदय,

वरील विषयाच्या संदर्भाधिन पत्रास अनुसरुन प्राप्त झालेल्या प्राधिकरणाच्या सातव्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देण्यासाठी सदरहू इतिवृत्त मा.मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आलेले होते.

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव यांच्या टिप्पणीनुसार प्रस्तुत इतिवृत्त मा.मुख्यमंत्री यांना मान्य आहे असे या विभागास कळविण्यात आलेले आहे. (सादर केलेल्या टिप्पणीची प्रत त्यावरील आदेशासह सोबत जोडली आहे.)

10/8

Secy

६।८।९८
( प्रकाश जोशी )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

११९/४

[illegible]

मुख्य कार्यकारी अधिकारी, [illegible] प्राधिकरण यांचे दिनांक १९ जुलै, १९९८ चे पत्र व [illegible] कार्यवृत्त व इतिवृत्त पहावे.

२. प्राधिकरणाची सातवी बैठक दि. २१ जून, १९९८ रोजी सायंकाळी ५.०० ते ७.०० यावेळी मा. मुख्यमंत्र्यांच्या [illegible] कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त तयार करुन मान्यतेसाठी सादर केले आहे. [illegible] चिन्हित करण्यात आलेले इतिवृत्त "अ" व "ब" असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादर केले आहे.

प्रस्तुत कार्यवृत्त [illegible] [illegible]

३. [illegible]

[illegible] (स्वाक्षरी) २०/७/९८
[illegible]
[illegible]

[illegible] (स्वाक्षरी) 21/7/98

[illegible] (श्री. गो. शर्मा) २१/७/९८

[illegible] (श्री. गोस्वामी)

मा. मुख्यमंत्री यांना सादर.
इतिवृत्त मान्य आहे.

(स्वाक्षरी) 22/7

मु. म. दिनांक 22/7/98

सचिव (मु. मं. का.)

(स्वाक्षरी) [illegible]



# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र.झोपुप्रा/बैठक/प्र.क्र.४१/९८/प्रशा/२३५२
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
दिनांक :- 14 JUL 1998

प्रति,

सचिव,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या ७व्या बैठकीच्या कार्यवृत्तास व इतिवृत्तास मंजुरी मिळण्याबाबत.

महोदय,

प्राधिकरणाची सातवी बैठक दिनांक २९ जून १९९८ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मा. मुख्य मंत्र्यांचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त तयार करून मान्यतेसाठी सादर केले आहे. तसेच विहीत नमुन्यातील इतिवृत्तही तक्ता 'अ' व 'ब' प्रमाणे सोबत सादर केले आहे. तरी प्रस्तुत कार्यवृत्त पुढील बैठकीत पक्के होण्याची वाट न पहाता, झालेल्या निर्णयावर मा. अध्यक्षांचे मान्यतेनंतर कार्यवाही सुरू करण्याची परवानगी असावी.

सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांना विनंती आहे की, त्यांनी प्रस्तुत बैठकीचे कार्यवृत्तास मा. अध्यक्षाची मान्यता घेवून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास परत पाठवावेत.

सहपत्रे : १. कार्यवृत्त
२. इतिवृत्त

आपला विश्वासू,

(गौतम चटर्जी)
मुख्य कार्यकारी अधिकारी

g:\rekha\gorde\min7mtg 7/9/98

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दिनांक २९/६/१९९८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीसाठी खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित असलेल्याची यादी:**

| अ.क्र. | नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | मा. मंत्री, गृहनिर्माण | सदस्य |
| ३ | मा. राज्यमंत्री, नगरविकास | सदस्य |
| ४ | मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण | सदस्य |
| ५ | मुख्य सचिव | सदस्य |
| ६ | महापालिका आयुक्त, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ७ | प्रधान सचिव, महसूल व वन विभाग | सदस्य |
| ८ | सचिव,गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ९ | प्रधान सचिव, नगरविकास | सदस्य |
| १० | श्री.शशी प्रभू, वास्तुशास्त्रज्ञ | सदस्य |
| ११ | श्रीमती शीला पटेल | सदस्य |
| १२ | श्री.दिपक सातवळेकर | सदस्य |
| १३ | श्री. अभिराम सिंह, विधान सभा सदस्य | सदस्य |
| १४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | सदस्य |
| १५ | मा.अध्यक्ष, महाराष्ट्र गृ.नि.व क्षे.वि. प्राधिकरण | विशेष निमंत्रित |
| १६ | सभापती, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ | विशेष निमंत्रित |
| १७ | मा. मंत्री, महसूल | विशेष निमंत्रित |
| १८ | विशेष कार्य अधिकारी, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | विशेष निमंत्रित |
| १९ | उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृ.नि.व क्षे.वि. प्रा. | विशेष निमंत्रित |
| २० | संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प | विशेष निमंत्रित |

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्राधिकरणाच्या दिनांक २९.६.९८ रोजी झालेल्या ७व्या बैठकीचे कार्यवृत्त.

| | | |
|---|---|---|
| बैठकीचे ठिकाण | : | मा.मुख्यमंत्र्यांचे समिती कक्ष,<br>मंत्रालय, मुंबई. |
| बैठकीची वेळ | : | सायंकाळी ५ वाजता |

**************

**बाब क्र. ७/१** **विषय :- प्राधिकरणाचे दिनांक १५.१.९८ रोजी झालेल्या ६व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची ६वी बैठक दिनांक १५.१.९८ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त माननीय मुख्य मंत्री व अध्यक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दिनांक ७.३.९८ रोजी मंजूर केले आहे. हे कार्यवृत्त प्राधिकरणाच्या ७व्या बैठकीत स्थायी करणयासाठी सादर केले होते. सदर कार्यवृत्तास काही दुरूस्ती सुचवावयाची आहे का, अशी मा.अध्यक्षांनी विचारणा केल्यावर, सदस्यांनी कोणतीही दुरूस्ती सुचविली नाही. तथापि बाब क्रमांक ६.८ वरील ठराव क्रमांक ६.८.५ मंजूर करताना मा.मंत्री, गृहनिर्माण यांनी 'कान्ह्याचा पाडा' या जुन्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत मंजूर केलेल्या योजनेस आर्थिक दृष्ट्या वर्धनक्षम करण्यासाठी २.५ पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून मिळावे अशी विकासकाने विनंती केली आहे याचा उल्लेख केला. या योजनेला सध्या १.६९ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक देण्यांत आला आहे. विकासकांने वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (२.५ - १.६९) हा फक्त विक्रीसाठी देण्यात यावा अशी विनंती केली आहे. योजनेच्या विकासकामार्फत वास्तुशास्त्रज्ञ श्री.बबलादी यांनी त्यांची बाजू मांडली. तथापि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या तरतुदीमध्ये सदर विनंती बसत नाही व त्यामुळे अशी विनंती मान्य करता येणार नाही असे मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सांगितले. मात्र कान्ह्याचा पाडा या क्षेत्रास 'कठीण क्षेत्र' म्हणून घोषित करता येवू शकेल किंवा कसे व त्याद्वारे योजना राबविण्यातील अडचणी दूर करता येतील का, या विषयी मा.मंत्री, गृहनिर्माण व मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांनी विचार करावा असे सुचविले. त्यानंतर ६व्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करण्यात आले.

**ठराव क्रमांक - ७.१.१ :** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दिनांक १५.१.९८ रोजी झालेल्या ६व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

**बाब क्र. ७/२ : अ (क)** **विषय :- प्रगतीचा अहवाल.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत आतापर्यंत प्राप्त झालेल्या व मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावांची दिनांक १.६.९८ रोजीची सद्य:स्थिती प्रगती अहवालाद्वारे प्राधिकरणास सादर करण्यात आली. त्यानुसार प्राधिकरणाकडे एकूण ४३० प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ३६७ प्रस्तावांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. मंजूर केलेल्या पुनर्वसन सदनिकेची संख्या ७५,६८९ एवढी असून त्यापैकी एकूण २३,२८९ सदनिकेच्या बांधकामास "काम चालू दाखला" देण्यात आल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली. उर्वरित मंजूर योजना अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर असल्याचेही नमूद करण्यात आले. प्राधिकरणाने वरील प्रगती अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र. ७/२ : अ (ख) :** **विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कामकाजाचा माहितीपट.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे पुनर्वसन योजनाना मंजुरी प्रदान करण्याव्यतिरिक्त पुनर्वसन योजना तयार करण्यासाठी मार्गदर्शन, सहकारी संस्थांची नोंदणी तसेच जमिनीचे सीमाकंन, मोजणी व भाडेपट्ट्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मदत करण्यात येते. प्राधिकरणाने आतापर्यंत केलेल्या कामाचे व प्राधिकरणामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व सेवांची माहिती संकलित करून त्यांचा आढावा घेणारा एक माहितीपट तयार केला आहे. हा माहितीपट दि. २.६.९८ रोजी झालेल्या मंत्री परिषदेच्या बैठकीपुढेही दाखविण्यात आला होता. सदर माहितीपट मराठी व्यतिरिक्त इंग्रजी भाषेतही तयार करण्यात आला असून तो प्राधिकरणाच्या ७व्या बैठकीत दाखविण्यात आला. मा. मुख्य मंत्र्यांनी व सदस्यांनी हा माहितीपट अतिशय उत्कृष्ट असल्याचे अभिप्राय व्यक्त केले. सर्व संबंधिताचे माहिती व मार्गदर्शनासाठी दूरदर्शन व इतर माध्यमाद्वारे हा माहितीपट लवकरच दाखविण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले. हा माहितीपट झोपडपट्टयातील विविध भाषिक घटकांपर्यत पोहोचावा म्हणून तो हिंदी भाषेत तयार करता येईल तर पहावे अशीही सूचना श्री.अभिराम सिंह यांनी केली.

**बाब क्र. ७/२ : ब** **विषय :- "झोपडपट्टी पुनर्वसन योजना" महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ खाली महाराष्ट्र राजपत्रात प्रसिध्दी केल्याबाबत -**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वरील अधिनियमाच्या कलम ३ च्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार केली असून त्यास प्राधिकरणाने दिनांक १५.१.९८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र.६.१०.६ अन्वये मान्यता दिली आहे. सदर अधिनियमाच्या कलम ३(ब) मधील पोट कलम (३) च्या तरतुदीनुसार बृहन्मुंबई क्षेत्रासाठी ही अंतिम झोपडपट्टी पुनर्वसन योजना दिनांक ९ एप्रिल ९८ च्या शासन राजपत्र भाग १ कोकण विभाग पुरवणी पृष्ठ क्र. ४३८ ते ४४२ वर प्रसिध्द करण्यात आल्याची माहिती प्राधिकरणास विशद करण्यात आली. सदर बाबीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**बाब क्र. ७/२ : क** **विषय :- झोपडपट्टीवासीय व विकासक तसेच जमीन मालक संस्था व विकासक यांनी करावयाच्या करारपत्राबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टीधारक व विकासक यांचेमध्ये करण्यात यावयाच्या संमतीदर्शक करारपत्राच्या नमुन्याला शासनाने मान्यता दिली आहे. तसेच जमीन मालक यंत्रणा व विकासक यांच्यात करावयाच्या करारपत्रालाही शासनाने दिनांक २७.४.९८ रोजी मान्यता दिली आहे. या करारपत्राचे नमुने म्हाडा, विकासकाची संघटना, स्वयंसेवी संघटना व झोपडपट्टीवासीयांना उपलब्ध करण्यात आले आहेत. प्राधिकरणाने वरील बाबीची नोंद घेतली.

**बाब क्र. ७/२ : ड** **विषय :- विकासकांना निधी उभारता यावा म्हणून जागेचा भाडेपट्टा देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी त्रिसदस्य समितीचे गठन -**

विकासकानी पुनर्वसन बांधकामासाठी किमान २० टक्के रक्कम खर्च केली असेल तर उर्वरित प्रकल्प पूर्ण करता यावा म्हणून जमिनीच्या गहाण खताद्वारे वित्तीय संस्था व बँकाकडून निधी उपलब्ध करण्यासाठी जमीन मालक यंत्रणेने विकासकास विक्री घटकाचे जमिनीचा भाडेपट्टा द्यावा अशी तरतूद शासनाने दिनांक ११ मार्च १९९८ च्या निर्णयाद्वारे केली आहे.

वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने, भाडेपट्टा देण्याची शिफारस करण्यासाठी एका त्रिसदस्य समितीचे गठन करण्यात आले आहे. प्राधिकरणाने या बाबीची नोंद घेतली.

**बाब क्र. ७/२ : इ** **विषय :- नागरी जमीन कमाल धारणा कायद्यातील कलम २० खाली सूट देण्याबाबतचे अधिकार.**

शासनाने ९ मार्च १९९८ च्या निर्णयानुसार झोपडपट्टी योजनेंतर्गत जमिनींना नागरी जमीन कमाल धारणा कायद्यातील कलम २० खाली सूट देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हयांना प्रदान केले आहे. ही बाब प्राधिकरणाच्या माहितीसाठी सादर करण्यात आली. प्राधिकरणाने त्याची नोंद घेतली.

**बाब क्र. ७/२ : फ** **विषय :- विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूद क्र. ३.११ अन्वये प्रकल्प राबविणाऱ्या संस्थांची जबाबदारी व कार्यपध्दती ठरवून देण्याबाबत.**

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूद क्र. ३.११ अन्वये एखाद्या जमीन मालकाने अतिमहत्वाच्या सार्वजनिक प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टीवासीयांसाठी स्वत:च्या खुल्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेप्रमाणे मोफत घरे प्रकल्प राबविणाऱ्या यंत्रणेस बांधून दिल्यास त्या जमिन मालकास जमिनीच्या मोबदल्यात अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक / हस्तांतरणीय विकास हक्क व बांधून दिलेल्या चटई क्षेत्राइतके हस्तांतरणीय विकास हक्क मिळण्याची तरतूद आहे. वरील तरतुदींतर्गत आलेले प्रस्तावांची छाननी व मंजुरी देण्यासाठी प्राधिकरणाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीची माहिती बैठकीत सादर करण्यात आली. ही कार्यपध्दती प्राधिकरणाने मंजूर केली.

जर अशा योजना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत राबवायाच्या असतील तर वरील तरतुदींतर्गत जमीन मालक त्यांना नको असलेली जमीन योजनेसाठी देवून हस्तांतरणीय विकास हक्क घेण्याची शक्यता नाकारता येत नाही असे मा. अध्यक्षांनी सांगितले. त्यामुळे या तरतुदींतर्गत शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी व मंजुरीसाठी सचिव, गृहनिर्माण, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प या तीन अधिकाऱ्यांच्या एका समितीचे गठन करावे व या समितीने

अशा जमिनीवरील योजना राबविण्याबाबत निकष व कार्यपध्दती ठरवावी असेही मा. अध्यक्षांनी आदेश दिले.

**ठराव क्र. ७.२.२ :-** विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूद क्र. ३.११ अन्वये जर अशा योजना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत राबवावयाच्या असतील तर शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी व मंजुरी करण्यासाठी सचिव, गृहनिर्माण, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प या तीन अधिकाऱ्यांच्या समितीचे गठन करण्यात येत आहे. या समितीने तरतूद क्र.३.११ अंतर्गत प्राप्त झालेल्या योजना राबविण्याबाबत निकष व कार्यपध्दती ठरवावी व त्यानुसार योजनेची अंमलबजावणी करावी. वरील तरतुदीप्रमाणे प्राप्त होणाऱ्या जमिनीवर कोणतेही अतिक्रमण होवू नये व पुनर्वसन प्रकल्प लवकर राबविला जावा म्हणून शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाने त्वरेने विकास कामे हाती घ्यावेत.

**बाब क्र. ७/२ : ग** **विषय :- महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.)अधिनियम १९७१ नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्याबाबत.**

शासनाने दिनांक २६.३.९८ रोजी एक अधिसूचना काढून अप्पर जिल्हाधिकारी, अतिक्रमणे, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे यांना आता मुंबई शहर व उपनगरे जिल्हयातील सर्व क्षेत्रासाठी 'सक्षम प्राधिकारी' म्हणून घोषित करण्यात आले आहे. प्राधिकरणाने वरील माहितीची नोंद घेतली.

**बाब क्र. ७/२ : ई**
**७/२ : ह** **विषय :- प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचारी वृंदामध्ये एक नवीन कार्यकारी अभियंता व एक दुय्यम अभियंत्याची नियुक्तीबाबत.**

महापालिकेकडून प्रतिनियुक्तीने प्राधिकरणाकडे कार्यरत असलेले श्री.एस.पी.जोशी, सहाय्यक अभियंता यांना महापालिकेने कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती दिली आहे. पदोन्नतीनंतर श्री.जोशी यांची प्राधिकरणात प्रतिनियुक्तीने कार्यकारी अभियंता या पदावर दिनांक ११.३.९८ पासून नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री.श.अ.कदम, दुय्यम अभियंता हे दिनांक २८.२.९८ रोजी नियत वयोमानानुसार निवृत्त झाले. तथापि श्री. कदम यांचा अनुभव लक्षात घेता प्राधिकरणाने त्यांची एका वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने रू. १०,०००/- दरमहा या एकत्रित वेतनावर दिनांक २ मार्च ९८ पासून नियुक्ती केली आहे.

वरील बाबींची प्राधिकरणाने नोंद घेतली व कार्योत्तर मंजूरी दिली.

**बाब क्र. ७/२ : ज** **विषय :- झोपडपट्टीवासीयांची पात्रता ठरविण्यासाठी शासनाकडून दिनांक १६ मे १९९८ चा प्राप्त झालेला शासन निर्णय.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टीवासीयांची पात्रता ठरविण्यासाठी शासनाने दिनांक १६ मे १९९६ च्या शासन निर्णयात योग्य ते फेरफार करून दिनांक १४ मे १९९८ रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. हया निर्णयामुळे, ज्या झोपडपट्टीवासीयांची नांवे व दिनांक १.१.९५ किंवा त्यापूर्वीच्या मतदार यादीत आली नाहीत. मात्र ते १.१.९५ पूर्वीपासून राहत असलेल्या झोपडयांचे क्रमांक मतदार यादीत आहेत व त्यांचेकडे १.१.९५ पूर्वीच्या वास्तव्याचे पुरावे आहेत अशा पात्र झोपडपट्टीवासीयांची प्रकरणे निकाली काढता येवू शकतील. वरील माहितीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**बाब क्र. ७/२ : ल** **विषय :- दिनांक ३०.१.९८ रोजी मा.मुख्य मंत्री यांचेकडे "समुद्रतटीय नियमन क्षेत्राच्या" बाबतीत झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तास मंजुरीबाबत.**

समुद्रतटीय नियमन क्षेत्राच्या बाबतीत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने सचिव, गृहनिर्माण यांचेकडून दिनांक ९.५.९८ रोजी प्राधिकरणास मार्गदर्शन व सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्या लॅन्डवर्ड साईडबाबतचा खुलासा अंतर्भूत आहे. त्यानुसार प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांत मंजुरीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकरणास विशद केले. प्राधिकरणाने त्याची नोंद घेतली.

प्रकल्पास, योजना परिणामकारकरित्या राबविण्यासाठी त्यांचेकडे किती मोकळी जमीन उपलब्ध आहे, एकूण किती जमिनीची आवश्यकता आहे, हे तपासण्याची सूचना केली. शिवाय ज्या ठिकाणी पुनर्वसन योजना राबवावयाची आहे तेथील झोपडपट्टीवासीयांची अनुकूलता व तयारी ही बाब अतिशय महत्वाची असल्याने त्याची खात्री करावी असे मा. मुख्य मंत्र्यांनी सांगितले. लोकप्रतिनिधीनी त्यासाठी आपआपल्या क्षेत्रातील झोपडपट्टीवासीयांमध्ये जागृती निर्माण करावी व योजना गतीशील करण्याचा प्रयत्न करावा. याशिवाय सर्व विभागामध्ये असलेल्या झोपडपट्ट्यांची व झोपडपट्टीवासीयांनी विकासकाबरोबर काही करार केले असल्यास त्याची माहिती शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाने महापालिकेकडून मिळवावी असेही सूचीत केले.

**बाब क्र. ७/३ : अ** **विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधलेल्या इमारतींना महापालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठयाबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात येत असलेल्या इमारतीना पुरेसा पाणीपुरवठा व्हावा म्हणून सध्याचे निकष बदलावे व झोपडपट्टीवासीयांना वाढीव पाणीपुरवठा अनुज्ञेय करावा अशी प्राधिकरणाने महापालिकेकडे विनंती केली आहे. त्यावर लवकरच योग्य ते परिपत्रक निर्गमित करण्यात येईल असे अतिरिक्त महापालिका आयुक्तांनी नमूद केले.

**बाब क्र. ७/३ : ब** **विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी उपलब्ध होणाऱ्या सदनिका ताब्यात घेण्याबाबत.**

झोपडपट्टयामध्ये झोपडयाची घनता प्रती हेक्टरी ५०० हून कमी आहे अशा ठिकाणी पुनर्वसन सदनिका बांधल्यावर घनतेप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या पी.अे.पी. सदनिका महापालिकेने ताब्यात घ्याव्यात अशी विनंती करण्यात आली आहे. महापालिका याबाबतीत लवकरच निर्णय घेईल असे बैठकीत नमूद करण्यात आले.

**बाब क्र. ७/२ : म** **विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रमास गती देण्यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची स्थापना.**

झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रमास अधिक गतीशील करण्यासाठी व डिसेंबर १९९९ पर्यंत २ लाख झोपडपट्टीवासीय कुटूंबियांना मोफत घरे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने दिनांक २८.५.९८ च्या निर्णयाद्वारे शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची स्थापना केली आहे. या प्रकल्पाच्या संचालकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बैठकीना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. प्राधिकरणाने त्यास मंजुरी दिली.

वरील विषयावर चर्चा करताना डिसेंबर १९९९ पर्यंत योजनेंतर्गत एकूण २ लाख सदनिका उपलब्ध करून देण्यासंबंधी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा मा.मंत्री, गृहनिर्माण यांनी आढावा घेतला. त्यासाठी गेल्या दोन महिन्यात महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसिंग इंडस्ट्री, विविध विकासक, बांधकाम क्षेत्रातील तज्ञ व सर्व संबंधितांच्या बैठका घेवून सातत्याने चर्चा करण्यात आल्याचे मा.मंत्री, गृहनिर्माण यांनी नमूद केले. या संबंधी लवकरच संबंधितांशी एक सामंजस्य करार करण्यात येईल असेही नमूद केले. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास मोठया प्रमाणावर योजना हाती घेता याव्यात म्हणून झोपडपट्टी क्षेत्रातील जमिनीचे सर्वेक्षण करणे, समभाग भांडवल तसेच बाजारातून ८ ते १० हजार कोटी रूपये एवढे प्रचंड भांडवल उभारणे इत्यादीबाबतीत केलेल्या पूर्ण तयारीचीही त्यांनी माहिती दिली. बांधकाम व्यवसायातील सध्याची स्थिती लक्षात घेता, खुल्या विक्रीच्या निवासी सदनिकांवर पूर्णपणे अवलंबून न राहता, जागेचा व्यापारी वापर करून निधी उभारण्याचीही कल्पना मा.मंत्र्यांनी मांडली.

मा.मंत्री, महसूल यांनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उभारताना फारशी अडचण येवू नये अशी अपेक्षा व्यक्त केली. तथापि बांधकाम क्षेत्रातील सध्याची परिस्थिती लक्षात घेता विक्री घटकातून पुरेसा निधी उभा करण्यावर भर देण्यात यावा असे सुचविले. योजनेची अंमलबजावणी करताना झोपडपट्टीवासीय जनतेला विश्वासात घेण्यात यावे असे सदस्य श्री.अभिराम सिंह यांनी सुचविले. तर मोकळया जागेची आवश्यकता भासल्यास आरक्षण बदलून योजना राबविण्याचे प्रयत्न करावे, असे श्री. रविंद्र वायकर यांनी सुचविले. झोपडपट्टी पुनर्वसन योजना सर्वांच्या हिताची असल्याने ही जोमाने राबविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे श्री.विलास अवचट यांनी चर्चेत भाग घेताना नमूद केले.

मा.मंत्री, गृहनिर्माण यांनी योजना गतीशील करण्यासाठी केलेल्या प्रयत्नाचा उल्लेख करून मा.मुख्य मंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी काही सूचना दिल्या. शिवशाही पुनर्वसन

**बाब क्र. ७/३ : क** **विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वापरलेल्या जमिनीना अकृषिक सारा ठरवून देण्याबाबत.**

पुनर्वसन योजना राबविण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या झोपडपट्ट्याच्या जमिनीना सुरूवातीपासून अकृषिक आकार न लावता ज्या दिवसापासून संबंधित संस्थांना जागेचा भाडेपट्टा देण्यात आला आहे. त्या दिवसापासून अकृषिक आकार लावावा अशी प्राधिकरणाने महसूल विभागास विनंती केली होती. याबाबतीत अधिनियमाच्या तरतुदी लक्षात घेवून योग्य तो खुलासा लवकरच पाठविण्यात येईल असे प्रधान सचिव, महसूल यांनी बैठकीत नमूद केले.

**बाब क्र. ७/३ : ड** **विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर उप जिल्हाधिकाऱ्याचे पद भरण्याबाबत.**

प्राधिकरणाकडे प्राप्त होणाऱ्या योजनामधील झोपडपट्टीवासीयांची पात्रता तपासणे, योजनेस विरोध करणाऱ्या झोपडपट्टीवासीयांचे निष्कासन करणे इत्यादी कामात झालेली वाढ लक्षात घेवून त्यासाठी एका उप जिल्हाधिकाऱ्याची सेवा प्राधिकरणास उपलब्ध करून द्यावी अशी महसूल विभागास विनंती करण्यात आली होती. त्यानुसार महसूल विभागाने श्री. पी.डी.निकुंभ, उप जिल्हाधिकारी यांची सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करून देण्याबाबतचे आदेश दि.२६.६.९८ रोजी निर्गमित केल्याचे नमूद करण्यात आले. प्राधिकरणाने त्याची नोंद घेतली.

**बाब क्र. ७/३ : इ** **विषय :- विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ३३(१०), परिशिष्ट ४ मधील तरतूद क्रमांक ६.१ ते ६.२६ यास नगर विकास विभागाची मंजुरी.**

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ ची वरील तरतूद नगर विकास विभागाने प्रलंबित ठेवली आहे. मुख्य अग्निशमन अधिकारी, महापालिका यांनी हयासंबंधी दिलेल्या अभिप्रायासह प्राधिकरणाने दिनांक १.४.९८ च्या पत्रान्वये नगर विकास विभागास पुढील कार्यवाहीची विनंती केली आहे. त्यावर लवकरच कार्यवाही करण्यात येईल असे प्रधान सचिव, नगर विकास यांनी बैठकीत नमूद केले.

**बाब क्र. ७/४ :** **विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी अशासकीय स्वयंसेवी संघटनांना मान्यता देण्याबाबत.**

प्राधिकरणाच्या ६ व्या बैठकीतील ठराव क्र.६.११.८ अन्वये योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वयंसेवी संघटनांना मान्यता देण्याचे अधिकार, प्राधिकरणाच्या मान्यते सापेक्ष मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी १. स्पार्क (सोसायटी फॉर प्रमोशन ऑफ एरिया रिसोर्स सेंटर्स), २. युवा (द युथ फॉर युनिटी अॅन्ड व्हॉलन्टरी अॅक्शन), ३. स्लम रिहॅबिलीटेशन सोसायटी (अॅडॉल्फ ट्रॅंगलर) व ४. विधायक संसद या अशासकीय स्वयंसेवी संघटनांना मान्यता दिलेली आहे. प्राधिकरणाने वरील कार्यवाहीस मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्र. ७.४.३** - वरील बाबींच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिलेल्या स्वयंसेवी अशासकीय चार [illegible]ांना दिलेल्या मान्यतेच्या कार्यवाहीस प्राधिकरणाने मंजूरी दिली.

**बाब क्र. ७/५ : -** **विषय :- पायाभूत सुविधाच्या खर्चासाठी आकारल्या जाणाऱ्या रूपये ८४०/- प्रती चौरस मीटर व मुंबई महापालिकेकडे पाण्याचे व गटाराचे पाईप्स टाकण्यासाठी भरावयाच्या आकारात सवलत देण्याबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील तरतुदींच्या अनुषंगाने सध्या अतिरिक्त चटई क्षेत्राच्या प्रत्येक चौरस मीटरला रूपये ८४०/- प्राधिकरणाकडून आकारले जातात. याशिवाय विकासकांना / सहकारी संस्थांना मुंबई महापालिकेकडे पाण्याचे व गटाराचे पाईप्स टाकण्यासाठी (खुल्या विक्रीच्या घटकासाठी) प्रती चौरस मीटर बांधकाम क्षेत्रास निवासी रू. १४०/- व वाणिज्य वापरासाठी रू. २००/- प्रमाणे आकार भरावा लागतो. वास्तविक प्राधिकरण वसूल करीत असलेल्या रू. ८४०/- प्रती चौरस मीटरमध्ये वरील दोन्ही आकाराचा समावेश होतो. जर विकासकाने ड्रेनेज व पाण्याचे पाईप्स टाकण्याच्या खर्चासाठी काही रक्कम महापालिकेकडे जमा केली असेल तर ती विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे भरावयाच्या रू.८४०/- प्रती चौरस मीटर हया आकारात समाविष्ट करण्यात यावी. विकासकाने महापालिकेकडे जमा केलेल्या रकमेचा तपशील (जास्तीत जास्त रू. ८४०/- प्रती चौरस मीटर

पर्यंत) झोपडपट्टी पुनर्वस प्राधिकरणास सादर केल्यास, अशा विकासकांकडून केवळ उर्वरीत रक्कमच (रू.८४०/- महापालिकेकडे भरणा केलेली रक्कम) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे भरावी. तथापि ड्रेनेज व पाण्याचे पाईप्स टाकण्याचा अंदाजित खर्च ८४०/- रू. प्रती चौरस मीटरपेक्षा अधिक असल्यास अधिकचा तेवढाच आकार महापालिकेने वसूल करावा असे प्रस्तावित करण्यात आले आहे. हया प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली व खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव क्र. ७.५.४ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अतिरिक्त चटई क्षेत्राच्या प्रत्येक चौरस मीटरला ८४०/- रूपये प्रमाणे पायाभूत सुविधासाठी आकार वसूल करते. त्यात पाण्याचे व गटाराचे पाईप्स टाकणयासाठी खर्चही अंतर्भूत असतो. जर विकासकाने या कामासाठी महापालिकेकडे काही रक्कम जमा केली असेल तर त्या संबंधीचा योग्य तो तपशील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास विकासकाने सादर केल्यास त्यांना, रूपये ८४०/- प्रति चौरस मीटरच्या मर्यादेपर्यंत, त्या आकारापोटी सूट देण्यात येईल व ८४०/- रूपयामधून ही सूट वजा जाता, उर्वरित रक्कम प्राधिकरणाकडे जमा करावी लागेल.

**बाब क्र. ७/६ :** **विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकासकाकडून जमा होणाऱ्या रूपये २०,०००/-प्रति सदनिका या निधीच्या वापराच्या नियोजनाबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्रत्येक पुनर्वसन सदनिकेमागे रू.२०,०००/- प्रमाणे विकासकाकडून ठेव वसूल करण्यात येते. या ठेवीच्या व्याजातून प्राप्त होणाऱ्या निधीचा वापर पुनर्वसन इमारतीच्या देखभालीसाठी करावा असे अभिप्रेत आहे. या रकमेच्या विनीयोगाबाबत बाब टिप्पणीवर प्राधिकरणाने चर्चा केली व त्यानंतर खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव क्र. ७.६.५ -** प्राधिकरणाकडे २०,०००/- रूपये प्रति पुनर्वसन सदनिकेप्रमाणे प्राप्त झालेली ठेव सुरूवातीच्या १० वर्षाकरिता मुदत ठेव म्हणून प्राधिकरण व संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या संयुक्त नांवाने ठेवण्यात यावी. जमा रक्कमेवरील अर्जित झालेले तिमाईचे व्याज नियमितपणे बँकेकडून संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या देखभालीचा खर्च भागविण्यासाठी देण्याची व्यवस्था करावी. १० वर्षाच्या कालावधीनंतर वरील रक्कम सहकारी संस्थांच्या नांवे वर्ग करण्यास हरकत नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संबंधात मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

**बाब क्र. ७.७ :** **विषय :- तरतूद क्र. ३.११ अंतर्गत येणाऱ्या प्रस्तावाखालील जमीन, तरतूद क्र. ३.१९ (२) अन्वये 'कठीण क्षेत्र' म्हणून जाहिर करण्यायोग्य ठरवावी या प्रस्तावास मान्यता देणे.**

विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदींतर्गत समजल्या जाणाऱ्या 'कठीण क्षेत्राच्या' जमिनीवर तरतूद क्र. ३.५ अनुसार १:१.३३ या प्रमाणात खुल्या विक्रीसाठीचे बांधकामे अथवा हस्तांतरणीय विकास हक्क अनुज्ञेय होतात. तरतूद क्र. ३.११ अनुसार जमीन मालकाने एखाद्या महत्वाच्या सार्वजनिक प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टीवासीय कुटूंबाचे पुनर्वसनासाठी स्वत:ची खुली जमीन दिली व त्यावर बांधलेल्या पुनर्वसन सदनिका प्रकल्प राबविणाऱ्या संस्थेला मोफत बांधून दिल्या तर त्या जमीन मालकास त्यांने बांधून दिलेल्या चटई क्षेत्राइतके हस्तांतरणीय विकास हक्क मिळतात शिवाय जमिनीच्या मोबदल्यात तेथे अनुज्ञेय असलेले हस्तांतरणीय विकास हक्कही मिळतात. अशी जमीन जर तरतूद क्र. ३.११ प्रमाणे सार्वजनिक महत्वाचे प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसनासाठी वापरली तर, तरतूद क्र. ३.१९(ii) चे अंतर्गत, अशी जमीन 'कठीण क्षेत्र' म्हणून घोषित करण्यास पात्र ठरते. या बाबींवर प्राधिकरणाने चर्चे अंती खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

**ठराव क्र. ७.७.६ :-** विकास नियंत्रण नियमावलीच्या क्रमांक ३.११ व ३.१९ (ii) या दोन्ही तरतुदींतर्गत जर महत्वाच्या सार्वजनिक प्रकल्पामुळे बाधित झालेल्या झोपडपट्टीवासीयांसाठी जमीन मालकाने देवू केलेली मोकळी जमीन वापरण्यात आली तर अशी जमीन तरतुद क्र. ३.१९ (ii) प्रमाणे 'कठीण क्षेत्र' म्हणून समजण्यास मंजुरी देण्यात येत आहे. हया जमिनीचेबाबतीत कलम ३.१९ (ii) प्रमाणे असे क्षेत्र 'कठीण क्षेत्र' म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी हे अधिसूचित करतील व महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करतील.

**बाब क्र. ७/८ :** **विषय :- शासकीय/निमशासकीय संस्था, शासकीय उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्था इत्यादींचा झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यामध्ये सहभाग व त्यासाठी त्यांना पी.अे.पी. म्हणून प्राप्त होणाऱ्या सदनिका परत करण्याबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना पुनर्वसन घटकांच्या किमान हेक्टरी ५०० सदनिका बांधल्या जाव्यात अशी तरतूद आहे. एखाद्या झोपडपट्टींमध्ये जर झोपडयाची घनता हेक्टरी ५०० हून कमी असेल तर तेथे निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सदनिका प्राधिकरणास विकासकाकडून /सहकारी संस्थाकडून विनामूल्य प्राप्त होतात. हया सदनिकांचा वापर सार्वजनिक प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या कुटूंबियांसाठी, संक्रमण गाळे म्हणून किंवा झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी/पदपथवासीयांच्या पुनर्स्थापनेसाठी करण्यात यावी अशी तरतूद आहे.

वरील तरतुदीप्रमाणे प्राप्त होणारे अतिरिक्त गाळे हे प्राधिकरणाने महाराष्ट्र पोलीस को-ऑप.हौसिंग फेडरशन यांना त्यांच्या सदस्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून द्यावेत अशी फेडरेशने प्राधिकरणास विनंती केली होती. फेडरशनच्या गृहनिर्माण संस्थांचे सभासदांना पोलीस कर्मचाऱ्यांच्या किफायतशीर किंमतीत सदनिका उपलब्ध व्हाव्यात या पार्श्वभूमीवर वरील विनंतीचा प्राधिकरणाने विचार केला. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्याबरोबरच, राज्य शासकीय कर्मचारी, शासकीय उपक्रमाचे कर्मचारी, महापालिकेचे कर्मचारी इत्यादींच्याही निवाऱ्यांचा प्रश्न बिकट असल्याने त्यांनाही आपापल्या गृहनिर्माण संस्थेद्वारे सदनिका उपलब्ध करता याव्यात म्हणून वरील सवलत देण्याचा प्राधिकरणाने विचार केला. त्यानंतर प्राधिकरणाने खालीलप्रमाणे ठराव मंजूर केला.

**ठराव क्र. ७.८.७ :-** विकास नियंत्रण नियम क्र. ३३(१०) परिशिष्ट-४ तरतूद क्र. ३.१२ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त होणाऱ्या पी.अे.पी. पुनर्वसन सदनिका राज्य शासनाच्या/ बृहन्मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक प्रकल्पानी बाधित होणाऱ्या कुटूंबियासाठी अथवा संक्रमण शिबीर म्हणून अथवा पात्र पदपथवासीयांचे पुनर्वसन करण्यासाठी वापरता येतात. तथापि शासकीय/निमशासकीय/शासकीय उपक्रम, महापालिका कर्मचाऱ्यांचे सहकारी संस्थांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याची तयारी दाखविल्यास या सदनिका शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रम, महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या गृहनिर्माण सहकारी संस्थांना प्राधिकरणाने विनामूल्य उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येत

आहे. तथापि असा वापर अनुज्ञेय करता यावा म्हणून विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूद क्र.३.१२ मध्ये खालीलप्रमाणे "परंतुका" अंतर्भूत करावी व विकास नियंत्रण नियमावलीमध्ये योग्य ते फेरबदल करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांना विहीत पध्दत वापरून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

'Provided if a Slum Rehabilitation Scheme is undertaken by a Federation / Co.- Op. Hsg. Society consisting of members who are serving or retired State Govt. employees/Employees of the state Govt. undertakings/Employees of local bodies of the State Govt. for providing housing to its members, such tenements which are generated over and above the tenements to be provided to the existing eligible hutment dwellers, shall be handed over back to the said Federation/Co.Op.Hsg.Society for providing housing to its above mentioned members and subject to further additional terms & conditions as would be imposed by the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority to ensure adequate membership of Class - III and Class - IV employees.'

वरीलप्रमाणे तरतूद अंतर्भूत केल्यानंतर अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रस्ताव मंजूर करण्यापूर्वी सहकारी संस्थांनी/कर्मचाऱ्यांने खालील अटी व शर्ती पूर्ण करणे आवश्यक राहील.

1) एकूण सभासदांपैकी किमान ८०% सभासद राज्य शासकीय/निमशासकीय उपक्रम/महापालिका कर्मचारी अथवा सेवानिवृत्त कर्मचारी असणे आवश्यक आहे.

२) अशा कर्मचाऱ्यांचे स्वत: अथवा कुटूंबियांच्या मालकीचे बृहन्मुंबई क्षेत्रात घर/सदनिका भूखंड असता कामा नये.

३) प्रकल्प राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण सहकारी संस्थेने/फेडरेशने सर्व सभासदांसाठी ना नफा-ना तोटा तत्त्वावर ही योजना राबविणे आवश्यक आहे.

वरील बाबींवर निर्णय झाल्यानंतर प्राधिकरणाची बैठक समाप्त झाली.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
दिनांक :- ९.७.१९९८.

१२१

तक्ता 'अ' सातवी बैठक

## दिनांक २९.६.९८ रोजी बैठकीतील निर्णयांची कार्यवाही पूर्ण झालेले मुद्दे.

| अ.क्र. १. | बाब क्र. २. | बैठकीत झालेले निर्णय ३. | जबाबदारी ४. | दिलेली कालमर्यादा ५. | विभागाने केलेली कार्यवाही ६. |
|---|---|---|---|---|---|
| १. | ७/१ | दि.१५. .९८ च्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्यांत आले. | - | - | दि.१५.१.९८ च्या ६व्या बैठकीचे कार्यवृत्त दि.२९.६.९८ रोजी झालेल्या ७ व्या बैठकीच्या वेळी स्थायी करण्यांत आले. |
| २. | ७/२- अ(ख) | निवारा - एक स्वप्नपूर्ती हा प्राधिकरणनिर्मित माहितीपट दूरदर्शन व इतर माध्यमांद्वारे दाखविण्यात यावा. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | त्वरीत | दूरदर्शनवर दि.९.७.९८ रोजी प्रसारित करण्यात आला आहे. |
| ३. | ७/२ - ब | झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम योजना राजपत्रात प्रसिध्दी करण्यात यावी. | --"-- | - | झोपडपट्टी पुनर्वसन योजना दि.९ एप्रिल ९८ च्या शासन राजपत्र भाग- कोकण विभाग पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. |
| ४. | ७/२ - क | झोपडपट्टीवासीय व विकासक तसेच जमीन मालक संस्था व विकासक यांच्यात करावयाच्या करारपत्राना अंतिम स्वरूप देण्यात यावे. | झो.पु.प्रा. व शासन, गृहनिर्माण विभाग. | - | झोपडपट्टीवासीय व विकासक तसेच जमीन मालक संस्था व विकासक यांच्यात करावयाच्या करारपत्रांना शासनाने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार या नमुन्याच्या प्रती म्हाडा, विकासकाच्या संघटना, स्वंयसेवी संघटना इत्यादींना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. |

g:\rekha\gorde\statmnt7 7/13/98

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | ७/२ - ड | जागेचा भाडेपट्टा देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी त्रिसदस्य समितीचे गठण करण्यात यावे. | झो.पु.प्रा. | - | या बाबतीत शासनाने ११ मार्च ९८ च्या शासन निर्णयाद्वारेत्रिसदस्य समितीचे गठन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार प्राधिकरणाने दि.११/३/९८ रोजी एका परिपत्रकाद्वारे त्रिसदस्य समितीचे गठन केले आहे. |
| ६. | ७/२ - फ | विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूद क्र.३.११ अन्वये प्रकल्प राबविणाऱ्या संस्थांची जबाबदारी व कार्यपध्दती ठरवून देण्यात यावी. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत या कलमा अंतर्गत राबवावयाच्या योजनेच्या बाबतीत प्रस्तावांची छाननी व मंजुरी करण्यासाठी तीन अधिकाऱ्यांच्या एका समितीचे गठन करण्यात यावे. | झो.पु.प्रा. | - | विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र.३.११ अन्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या मान्यतेसाठी प्राधिकरणाने कार्यपध्दती निश्चित केली आहे. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पामार्फत कलम ३.११ अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी व मंजुरी करण्यासाठी तसेच अशा जमिनीवरील योजना राबविण्याबाबत निकष व कार्यपध्दती ठरविण्यासाठी ३ अधिकाऱ्यांच्या एका समितीचे गठन करण्यात येत आहे.<br>१. सचिव, गृहनिर्माण, २. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. ३. संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प हे तीन अधिकारी या समितीत असतील. |
| ७. | ७/२ - ल | समुद्रतटीय नियमन क्षेत्राच्या बाबतीत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत. | झो.पु.प्रा. | - | दि.३०.१.९८ रोजी मा.मुख्य मंत्री यांचेकडे या बाबतीत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने सचिव, गृहनिर्माण यांचेकडून दि.९.५.९८ रोजी सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणात मंजुरीची कार्यवाही सुरू करण्यात आली. |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
दिनांक :- ९.७.९८.

सातवी बैठक

## तक्ता 'ब'

### दि. २०.६.९८ च्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बैठकीतील ठरावातील प्रलंबित मुद्दे.

| अ.क्र. १. | बाब क्र. २. | बैठकीत झालेले निर्णय ३. | अंमलबजावणीसाठीची जबाबदारी ४. | दिलेली कालमर्यादा ५. | प्रलंबित रहाण्याची कारणे. ६. |
|---|---|---|---|---|---|
| १. | ७/३ - अ | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींना महापालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठयाबाबत. | मुंबई महानगर महापालिका | - | याबाबतीत महापालिकेकडून लवकरच योग्य ते परिपत्रक निर्गमित करण्यात येईल असे महापालिकेतर्फे नमूद करण्यात आले. |
| २. | ७/३ - क | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वापरलेल्या जमिनींना अकृषिक सारा ठरवून देण्याबाबत. | महसूल व वन विभाग | - | या बाबतीत अधिनियमाच्या तरतुदी लक्षांत घेवून योग्य तो खुलासा लवकरच पाठविण्यात येईल असे महसूल विभागातर्फे नमूद करण्यात आले. |
| ३. | ७/३ - इ | विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्र. ६.१ ते ६.२६ यास नगर विकास विभागाची मंजुरी. | नगर विकास विभाग | - | प्राधिकरणाकडून नगर विकास विभागाकडे योग्य ते अभिप्राय पाठविण्यात आले आहेत. त्यावर नगर विकास विभागाकडून लवकरच कार्यवाही होईल असे सांगण्यात आले. |

g:\rekha\gorde\sttmnt7b 7/9/98

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | ७/५ | पायाभूत सुविधांच्या खर्चासाठी आकारल्या जाणाऱ्या ८४०/- प्रति चौरस मीटर व मुंबई महापालिकेकडे पाण्याचे व गटाराचे पाईप्स टाकण्यासाठी भरावयाच्या आकारास सवलत देण्याबाबत. | झो.पु.प्रा. व मुंबई महानगरपालिका | - | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून याबाबतीत परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. या ठरावाच्या अनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने योग्य ती कार्यवाही करावी असे कळविण्यात आले आहे. |
| ५. | ७/६ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा कडे जमा होणाऱ्या रू.२०,०००/- प्रती सदनिका या निधीच्या वापराबाबत. | झो.पु.प्रा. | - | या बाबतचे सविस्तर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. |
| ६. | ७/७ | तरतुद क्र. ३.११ अंतर्गत येणाऱ्या प्रस्तावाखाली जमिनींना तरतुद क्र.३.११ (ii) अन्वये 'कठीण क्षेत्र' म्हणून जाहिर करण्याबाबत. | झो.पु.प्रा. | - | या बाबतीत विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. ३.११ अंतर्गत येणाऱ्या प्रस्तावांना 'कठीण क्षेत्र' म्हणून अधिसूचित करण्याची कार्यवाही प्राधिकरणातर्फे करण्यात येत आहे. |
| ७. | ७/८ | शासकीय/निमशासकीय संस्था/ उपक्रम यांच्या इत्यादींच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यामध्ये सहभाग व त्यासाठी त्यांना पी.ओ.पी. सदनिका विनामूल्य परत करण्याबाबत. | झो.पु.प्रा. | - | प्राधिकरणाने मंजुरी दिल्याप्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुद क्र. ३.१२ मध्ये 'परंतुका' अंतर्भूत करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. |